॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव २२ (            ) विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांनी कोणत्या ना कोणत्या चळवळीशी जोडून घ्यायला हवे तसेच एकत्र येवून विचारमंथन करून काही उपक्रम आखायला हवेत या संघटन शक्तीतूनच उद्याच्या नवनिर्मितीची बिजे रोवली जातील असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष प्रवीण घुगे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सोमवारी डॉ.केशव बळीराम हेडगेवार व्याख्यानमाला झाली. या व्याख्यानमालेत संघटन या विषयावर ते बोलत होते. कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील अध्यक्षस्थानी होते. यावेळी मंचावर केशव स्मृती प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष निळकंठ गायकवाड, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य दिलीप रामू पाटील उपस्थित होते.

जळगाव जनता बँक केशव स्मृती प्रतिष्ठान यांनी दिलेल्या देणगीतून या व्याख्यानाचे आयोजन केले जाते. श्री.घुगे म्हणाले की, सेवाभावी वृत्तीची कामे समाजात उभी रहावी असे वाटत असेल तर समाजातील सज्जन शक्तींनी एकत्र यायला हवे, तेच संघटन असते. किर्तन, दिंडी,वारी, सामाजिक संघटना ही समाज प्रबोधनाची माध्यमे आहेत. संघटन शक्तीतून विविध उपक्रम राबविले तर संस्कृती टिकुन राहते. भारतावर अनेक आक्रमणे होवून देखील समाजमन तोडू शकले नाही. चळवळीसमोर लक्ष्य निर्धारीत करता आले पाहिजे. शिवरायांनी इथल्या मातीचा, लोकांचा विचार केला आणि त्यातून हिंदवी स्वराज्य उभे राहीले. समर्पण वृत्तीच्या कार्यकर्त्यांची फळी उभी राहीली तर संघटन यशस्वी होते. हे सांगताना श्री घुगे यांनी अविनाश आचार्य यांचे उदाहरण दिले. विद्यापीठांमधून परिवर्तनाची चळवळ उभी रहावी. विद्यार्थ्यांनी कोणत्याही एका उपक्रमाशी स्वत:ला जोडून घ्यावे असे आवाहन करताना त्यांनी मैत्रीची परिभाषा आता तरूणांमध्ये बदलत चालली आहे. व्यक्त होण्याच्या वयात ही तरूण पिढी एकत्र येत नसेल तर चिंतेची बाब आहे असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा.पाटील यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी अशा व्याख्यानांचा विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होतो असे मत व्यक्त केले. श्री.निळकंठ गायकवाड यांनी केशव स्मृती प्रतिष्ठानच्या उपक्रमांची यावेळी माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.सुनील पाटील यांनी केले.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 22 ऑक्टोबर, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

☎ : (९१) ०२५७- (२२५७२४८, २४९, २५३) वेबसाईट : www.nmu.ac.in

फॅक्स : (९१) ०२५७- (२२५८४०३, ४०६) ई-मेल : pro@nmu.ac.in